**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाच्या पंचाहत्तरीनिमित्त मुंबईत विधान भवनात राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ

- इराण - इस्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या दरात वाढ/ भारताकडे पुरेसा तेलसाठा असल्याचा हरदिपसिंग पुरी यांचा विश्वास

- राज्य शिक्षण मंडळाच्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राला विदर्भात आजपासून सुरुवात

**आणि**

- ऑलिंपिक पदक विजेता हॉकीपटू ललित उपाध्यायची आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्तीची घोषणा

**<><><><><>**

राष्ट्रीय अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्ताने एका राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेचं उद्घाटन आज मुंबई इथं विधानभवनात लोकसभेचे सभापती ओम बिरला यांच्या हस्ते झालं. वर्धापन दिन स्मरणिकेचं प्रकाशनही यावेळी बिरला यांनी केलं. अर्थसंकल्पीय अंदाजांची समीक्षा आणि पुनरावलोकनात अंदाज समितीची भूमिका हा या कार्यक्रमाचा मुख्य विषय आहे.

प्रशासनाची कार्यक्षमता सुधारण्यात आणि प्रशासकीय सुधारणांची अंमलबजावणी करण्यात अंदाज समित्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचं प्रतिपादन बिरला यांनी यावेळी केलं.

या प्रसंगी राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस,

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. लोकशाही राज्यव्यवस्थेत संसद सरकारला नियंत्रणात ठेवण्याचं काम करते आणि हे काम अंदाज समितींच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे केलं जातं, असं फडनवीस यावेळी म्हणाले. गरीब कल्याण हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा उद्देश असून विकासासाठी खर्च केला जाणारा प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने संसदेच्या अंदाज समितीचं काम खूपच परिणामकारक ठरतं, असं शिंदे यावेळी म्हणाले.

**<><><><>**

इराण आणि इस्रायलमध्ये अद्याप संघर्ष सुरु आहे. अमेरिकेनं काल इराणवर हल्ला केल्यानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खा◌ेमेनी यांनी इस्रायलवर हल्ले सुरु ठेवणार असल्याचं म्हटलं आहे. इस्रायलनं मोठी चूक केल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. इराणच्या संसदेनं फोर्डो, नतांज आणि एस्फहान इथल्या इराणी आण्विक तळ अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर जगातला सर्वात महत्त्वाचा तेल आणि वायू वाहतूक मार्ग असलेल्या होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा प्रस्ताव एकमतानं मंजूर केला आहे. या मार्गावरची सागरी वाहतूक बंद करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अंतिम अधिकार इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेकडे आहे. या परिषदेनं अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा केली नसली तरी या निर्णयामुळे जागतिक स्तरावर तेलाची किंमत प्रति बॅरल शंभर डॉलर्सच्या वर जाऊ शकते. दरम्यान, अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांनी अत्यंत सावधगिरीने या भागात लष्करी दल तैनात केलं आहे.

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघचित आज रशियाला पोहोचले. अमेरिकेच्या लष्करी कारवाईनंतर ते रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची शक्यता आहे. इराणमध्ये सत्ता बदलण्याची शक्यता

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वर्तवली आहे. ऑस्ट्रेलियन परराष्ट्र मंत्री पेनी वोंग यांनी इराणवर हल्ला करण्याच्या राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या निर्णयाला पाठिंबा दिला आहे.

**<><><><><>**

इराणकडून क्षेपणास्त्र हल्ल्याचा धोका असल्यानं इस्रायलच्या लष्करानं मध्य आणि दक्षिण इस्रायलमध्ये हवाई हल्ला सायरन सक्रिय केले आहेत. जेरुसलेमच्या आकाशात आज काही क्षेपणास्त्र दिसल्याचं एका खाजगी वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. गेल्या दहा दिवसांत, मध्य इस्रायलमध्ये मोठं नुकसान झाले आहे, उत्तरेकडील बंदर शहर हैफा इथंही वारंवार हल्ले झाले आहेत. इराण आणि इस्रायलमधील सुरू असलेल्या संघर्षामुळे व्यापक प्रादेशिक युद्धाची भीती निर्माण झाली आहे. संकट कमी करण्यासाठी मॉस्कोमध्ये उच्चस्तरीय चर्चा सुरू असल्याचं वृत्त आहे.

दरम्यान चीननं दोन्ही देशांना संघर्ष थांबवण्याचं आवाहन केलं आहे. दोन्ही देशांमधला संघर्ष कमी व्हावा आणि या समस्येवर राजकीय तोडगा काढण्यात यावा असं आवाहन चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते गुओ जियाकुन यांनी आज केलं आहे. इस्रायलसोबतचा सहकार्य करार स्थगित करण्यासाठी आणि शस्त्रास्त्र निर्बंध लादण्याबाबत विचार करण्यासाठी युरोपियन युनियनला विनंती करणार असल्याचं स्पेनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेने इराणवर हल्ला केल्याच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किमतीमधे आज वाढ झाली आहे. ब्रेंट क्रूड ऑईलची किंमत दोन टक्क्यानी वाढून ७९ डॉलर प्रति बॅरल इतकी झाली आहे तर डब्ल्यूटीआय क्रूड ऑईलची किंमत ७५ डॉलर प्रति बॅरल इतकी झाली आहे. गेल्या पाच महिन्यातली ही सर्वोच्च वाढ आहे. मध्य आशियामधे सुरू असलेल्या संघर्षामुळे तेलाच्या किमतीत सलग तिसऱ्या आठवड्यात वाढ झाली आहे. इराणने जगातला सर्वात महत्त्वाचा तेल

वाहतूक मार्ग असलेल्या होर्मुजच्या समुद्रधुनीला बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे तेलाच्या किमती अधिक वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

<><><><>

भारताकडे तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध असून गेल्या दोन आठवड्यातील पश्चिम आशिया भागातल्या भूराजकीय परिस्थितीकडे भारत सरकार बारकाईनं लक्ष ठेवून आहे, असं केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदिपसिंग पुरी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. भारताने गेल्या काही वर्षांत आपल्या कच्च्या तेल आयाती संदर्भातील पुरवठा साखळीत विविधता आणली आहे आणि आता होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणात पुरवठा होत नाही. तसंच भारतीय तेल विपणन कंपन्यांकडे अनेक आठवडे पुरेल एवढा तेल साठा उपलब्ध आहे. भारतीय नागरिकांना इंधनाचा पुरवठा स्थिर राहावा यासाठी सरकार सर्व आवश्यक पावलं उचलत आहे, अशी माहिती त्यांनी या संदेशात दिली आहे.

<><><><>

राज्य शिक्षण मंडळाच्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राला विदर्भात आजपासून सुरुवात झाली.

वाशिम जिल्ह्यात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात आलं. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचं पुष्पगुच्छ देऊन स्वागत केलं.

यवतमाळ जिल्ह्यातही प्रभात फेरी काढून शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात आलं. सुकळी इथं फुगे आणि हारांनी सजवलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांची वाजत गाजत मिरवणूक निघाली. विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ पाठ्यपुस्तके देऊन करण्यात आलं.

गोंदिया जिल्ह्यात आज शाळेच्या पहिल्या दिवशी ‘पहिलं पाऊल' उपक्रमांतर्गत नव्या विद्यार्थ्यांचे ठसे उतरवण्यात आले. त्यांना वह्या, पुस्तके आणि

गणवेशाचे वाटप करण्यात आलं. तसेच, फुलं देऊन त्यांचं विशेष स्वागत करण्यात आलं.

<><><><>

एसटी महामंडळ गेल्या ४५ पैकी ३८ वर्ष तोट्यात होते. २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या अखेर महामंडळाला १० हजार कोटींपेक्षा अधिक तोटा झाल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. एसटी महामंडळाची श्वेत पत्रिका आज प्रसिद्ध झाली. या तोट्यामागे बसची कमतरता, अनियमित भाडेवाढ, अवैध वाहतूक यासारखी कारणे श्वेतपत्रिकेत नमूद आहेत. दरवर्षी ५ हजार बसची खरेदी, इलेक्ट्रिक तसेच सीएनजी- एलएनजी आधारित बसचा समावेश, महामंडळाच्या जागांचा पीपीपी तत्त्वावर विकास, अपघातांचे प्रमाण कमी करणे यासारख्या पर्यायांचा समावेश श्वेतपत्रिकेत आहे.

<><><><>

भारतासाठी हॉकीमध्ये दोनवेळा ऑलिंपिक पदक जिंकणारा ललित उपाध्याय याने आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. भारतानं बेल्जियमविरुद्धच्या FIH प्रो लीग सामन्यात ४-३ असा विजय मिळवत आपला हंगाम संपवला, त्यानंतर लगेचच ललितने समाजमाध्यमावर सर्वांना आपल्या निर्णयाची माहिती दिली. ललित उपाध्यायनं भारतासाठी १८३ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि ६७ गोल केले आहेत. २०१४ च्या हॉकी विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या ललितनं टोकियो २०२० आणि पॅरिस २०२४ ऑलिंपिकमध्ये प्रत्येकी एक कांस्यपदक जिंकलं आहे. भारतीय हॉकीमधल्या योगदानाबद्दल ललितला २०२१ मध्ये अर्जुन पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

<><><><>

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावामुळे आज भारतीय शेअर बाजारात घसरण दिसून आली. आयटी आणि ऑटो क्षेत्रात विक्री झाल्याचे थेट परिणाम

निर्देशांकांवर झाले. अमेरिकेने इराणच्या आण्विक तळांवर केलेल्या हल्ल्यांनंतर ही घसरण झाली आहे. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ४०० पेक्षा जास्त अंकांची घसरण झाली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये १००हून अधिक अंकांची घसरण झाली आहे.

<><><><><>

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्यस्तरीय अधिवेशनाला कालपासून नाशिक इथं प्रारंभ झाला. कम्युनिस्ट पक्षाचा लढा प्रस्थापित सरकारच्या जनविरोधी धोरणांच्या विरोधात कायम राहील, असं यावेळी अधिवेशनाचे अध्यक्ष भालचंद्र कांगो यांनी म्हटलं आहे. तर देशातील दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक यांचे लढे एकमेकांशी जोडले गेले आहेत, म्हणून नव्या पद्धतीने पक्ष बांधण्याची गरज आहे, असं भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या अमरजीत कौर यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबईत गोरेगाव इथं व्हिसलिंग वुड्स इंटरनॅशनल फिल्म सिटी कॉम्प्लेक्समध्ये आज सकाळी आग लागली. अनुपमा स्टुडिओच्या ५ हजार चौरस फूट परिसरात लागलेल्या या आगीत इलेक्ट्रिक वायरिंग, इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन, कॅमेरे, स्टुडिओ उपकरणं, सजावटीचं साहित्य, पोशाख, प्रकाश व्यवस्था, आदी सामानाचं नुकसान झालं.

//<><><><><>//